# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

"उद्योग सारथी", महाकाली गुंफा मार्ग, मरोळ औद्योगिक क्षेत्र, अंधेरी (पूर्व), मुंबई- ९३

जा.क्रं.मऔविम/साप्रवि/प्राज(आन)/ /२०२५ P563815 दिनांकः- 17 OCT 2025

परिपत्रक

विषय : माहिती तंत्रज्ञान उद्यानामधील भूखंड खाजगी विकासकामार्फत विकसीत केलेल्या माहिती तंत्रज्ञान इमारतीमधील विनाशुल्क गाळा हस्तांतरणाकरीता परिपत्रकास मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भ : परिपत्रक क्र.मऔविम/मावतं विभाग/डी०९३३४/२०२० दि.२५/११/२०२०.

माहिती तंत्रज्ञान उदयानात आणि माहिती तंत्रज्ञान विशेष आर्थिक क्षेत्रातील तसेच औद्योगिक क्षेत्रातील भूखंडावर उभारलेल्या माहिती तंत्रज्ञान उदयानातील इमारतीमधील जागेचे पहिले हस्तांतरणासाठी वरील संदर्भिय परिपत्रकामधील धोरणानुसार कोणतेही शुल्क आकारण्यात येत नाही. सदर सवलत ही परिपत्रकाच्या दिनांकापासून पाच वर्षापर्यत म्हणजेच २०/०७/२०२० ते १९/०७/२०२५ पर्यत अस्तित्वात होती. परंतु माहिती तंत्रज्ञान उदयानामधील भूखंडधारक माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील सध्याची घसरण तसेच जागतिक मंदी इत्यादीमुळे संकटत सापडलेल्या माहिती तंत्रज्ञान उद्योगाला प्रोत्साहीत करणेकरीता उद्योजकांनी बांधलेल्या इमारतीमधील गाळयांच्या पहिल्या हस्तांतरणाचा कालावधी वाढविण्याची आवश्यकता निर्माण झाल्याने त्याबाबतचा विषय दिनांक १२/०९/२०२५ रोजीच्या ४०७ व्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये सादर करण्यात आला होता. सदर विषयावर सविस्तर चर्चा होउन खालील प्रमाणे ठराव क्र ६९९५ पारीत करण्यात आला आहे.

महामंडळाचे दि २५/११/२०२० च्या परिपत्रकानुसार माहिती तंत्रज्ञान उदयानातील इमारतीमधील गाळयाचे पहिले विनाशुल्क हस्तांतरणाचा कालावधी पाच वर्षापर्यंत म्हणजेच दि १९/०७/२०२५ पर्यत होता. तथापि दि २०/०७/२०२० ते दि १९/०७/२०२५ या कालावधीकरीता निर्गमित केलेल्या धोरणास पुढील पाच वर्ष म्हणजेच दि २०/०७/२०२५ ते दि १९/०७/२०३० पर्यत विनाशुल्क मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदरहू परिपत्रक मा मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सह मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन)
मऔविम, मुंबई-९३

प्रत,

१. सह मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन), मऔविम, मुंबई
२. सह मुख्य कार्यकारी अधिकारी (विदर्भ), मऔविम, मुंबई
३. सह मुख्य कार्यकारी अधिकारी (३), मऔविम, मुंबई
४. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.